# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. 08/06/2017

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक 08/06/2017 रोजी सभा सुचना क्र. 04 दि. 03/05/2017 रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी 11.00 वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

<u>उपस्थित सदसय</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| 2. | श्री. हरिश्चंद्र आमगावकर | सदस्य |
| 3. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| 4. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| 5. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| 6. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| 7. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| 8. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| 9. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| 10. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| 11. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| 12. | श्रीम. झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| 13. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |

**<u>गैरहजर</u>** <u>सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| 2. | श्री. राजू यशवंत भो□र | सदस्य |
| 3. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

मा. सभापती :-

सर्व सदस्यांना नमस्कार. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

मा. आयुक्त :-

सर्व सन्मा. सदस्यांना माझी ओळख करुन देतो. माझे नाव सुधीर राऊत. मी 2 जूनला अतिरिक्त आयुक्त म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जॉइन्ट झालो. मा. सभापतींनी ज्या काही सुचना दिल्या त्या पध्दतीने सभा व्हावी अशी अपेक्षा आहे. धन्यवाद.

प्र. नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक 09/05/2017 रोजी सभा सुचना क्र. 03 दि. 06/05/2017 रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी 11.00 वा. सभा आयोजित करण्यांत आली होती. प्रकरण क्र. 21, दि. 17/02/2017, दि. 07/03/2017 व 10/04/2017 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

झिनत कुरेशी :-

पेज नं. 5 पे शिक्षण विभाग उधर अनुमोदन वर्षा भानुशाली लिखा है वहाँ मेरा अनुमोदन है|

प्र. नगरसचिव :-

चेक करुन करेक्शन करतो.

मर्लिन डिसा :-

पान क्र. 1 वर विचारले होते खासदार निधी कोणत्या खासदाराची होती तो प्रश्न विचारला होता. मला उत्तर दिले नाही.

मा. सभापती :-

पुढच्या मिटींगमध्ये उत्तर मिळेल.

हरिश्चंद्र आमगावकर :-

दि. 17/02/2017, दि. 07/03/2017 व 10/04/2017 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

तारा घरत :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 21 :-

दि. 17/02/2017, दि. 07/03/2017 व 10/04/2017 रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 21 :-

दि. 17/02/2017, दि. 07/03/2017 व 10/04/2017 रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदन :- श्री. तारा घरत

ठराव सर्वानुमते मंजुर

सही /-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

अग्निशमन कर्मचाऱ्यांनी स्थायी समिती सभापती ह्यांच्याकडे एक अपिल सादर केले. त्या अनुषंगाने 'के' चा प्रस्ताव घेण्यात येत आहे त्याला सर्वांची मान्यता आहे का?

मा. सभापती :-

हो सर्व सदस्यांची मान्यता आहे.

वर्षा भानुशाली :-

ह्याच्या अगोदर विषय काय ते सांगा.

मर्लिन डिसा :-

केसचे स्टेटस काय आहे.

मा. सभापती :-

आपण प्रशासनाकडून माहिती मागवतो. लॉ ऑफिसर आणि सामान्य प्रशासन विभागाकडून ह्याची माहिती मागवली. त्यानंतर निर्णय घेऊ.

मर्लिन डिसा :-

निर्णय घेण्या अगोदर काय प्रकरण आहे त्याचा खुलासा करा.

प्र. नगरसचिव :-

त्यांचा अभिप्राय आल्यावर त्याच्यात तुम्हाला कळेल.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

सन्मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो ह्या विषयामध्ये डिटेल संचिका आता जे अपिल आले आहे त्या अनुषंगाने बोलतो. ह्यापूर्वी ह्याच्या नियुक्तीच्या विरोधामध्ये पिटीशन दाखल झालेले होते. त्यानंतर त्यांची शैक्षणिक अर्हता ह्या सगळ्या बाबींच्या अनुषंगाने त्यावेळी त्यांना बडतर्फ करण्यात आले होते. त्या आदेशाविरुध्द औद्योगिक न्यायालयामध्ये त्यांनी स्थगिती घेतली होती.

मर्लिन डिसा :-

अपॉइन्टमेंट करताना माहित नव्हते का शैक्षणिक पात्रता नाही म्हणून?

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

ज्यावेळी मुलाखतीला येतात तेव्हा डॉक्युमेंट क्रॉसचेक करत नाही.

मर्लिन डिसा :-

डॉक्युमेंट व्हेरीफाय करत नाही ते चुकीचे आहे.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

मुलाखतीला येतात तेव्हा व्हेरीफिकेशन होत नाही.

मर्लिन डिसा :-

अपॉइन्टमेंट दे�पर्यंत व्हेरीफिकेशन करायला पाहिजे.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

आपल्या फायरच्या स्टाफमध्ये कमतरता असते. एवढे व्हेरीफिकेशन करत बसले तर.............................

मर्लिन डिसा :-

एवढे या लोकांना बरखास्त केले तर रिप्लेसमेंट केले का? आता पावसाळा येत आहे. इमरजन्सी आहे.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

प्रशासनाचे म्हणणे आहे डिटेल सादर करु.

मर्लिन डिसा :-

डिटेल सादर करा. आणि आता पावसाळा येत आहे इमरजन्सीमध्ये आम्हाला पाहिजे.

असेन्ला मेन्डोंसा :-

वी आर सेईंग व्हेरीफिकेशन नॉट डन रा�ट. बट वॉट द सर्टिफिकेट दॅट वॉज गिव्हन फेक. ऑल द सर्टिफिकेट नॉट प्रोव्हा�ड ॲन्ड स्टिल अपॉईंटेड बिकॉज धिस इज द प्रॉब्लेम ऑफ एम.बी.एम.सी.

विजयकुमार म्हसाळ (उपायुक्त (मु.) :-

विथ स्टेबल इट विथ डिटेल इन्फॉर्मेशन.

मा. सभापती :-

सर सोमवारपर्यंत अभिप्राय द्या.

मर्लिन डिसा :-

आता पावसाळा येत आहे. किती तरी धोकादायक इमारती आहेत. शितलनगर एरियामध्ये प्रेशरने पर्टिक्युलर सोसायटी शितल पॅराडाइज दुसऱ्या माळ्याचा सिलिंग गेल्यावर्षी पडला होता. आपल्या पालिकेने नोटिस पाठवली. त्यांना व्हेकेट करायला सांगितले ती लोक कोर्टात गेले. पण आता प्रेशर करुन व्हेकेट करायला सांगत आहेत. एक वर्ष आपली पालिका झोपली होती का? एक वर्षानंतर लगेच प्रेशर करत आहेत. ते फॉलो अप करुन रेग्युलरली केले असते तर एवढ्यात बिल्डींग व्हेकेट झाली असती. पावसाळ्यात अशी कितीतरी प्रकरण आहेत. धोकादायक इमारती विषयी प्रोसीजर काय आहे.

मा. सभापती :-

पुढच्या मिटींगला विषय घ्या.

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. 22, क्रिडा संकुल व्यवस्थापन व संचलनासाठी देणेबाबत मंजूरी.

शरद पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करणेसाठी दि. 10/07/2017 ते दि. 18/04/2017 रोजी या “महाराष्ट्र सम्राट” तसेच “भायंदर” या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर-निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर फेर-निविदा उघडण्याची अंतिम दि. 18/04/2017 रोजी होती. परंतु सदर फेर-निविदेच्या (Tender ID No. 207436_1) बीड काऊंटपेजवरुन दोन निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे सदर फेर-निविदेस दि. 24/04/2017 पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतीमध्ये क्रीडा संकुल व्यवस्थापनाकरीता एकुण 4 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर मुदतवाढीमध्ये बीड काऊंट पेजवरुन चॅम्पियन फाऊंडेशन, केरकर चॅरिटेबल ट्रस्ट, कोकण सेवा संस्था, मानव सेवा प्रतिष्ठान अशा एकुण 4 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांनी निविदेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | चॅम्पियन फाऊंडेशन | केरकर चॅरिटेबल ट्रस्ट | कोकण सेवा संस्था | मानव सेवा प्रतिष्ठान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संस्था नोंदणी अधिनियम 1860, मुंब� सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम 1950 या पैकी एक नुसार संस्था नोंदणी आवश्यक आहे. तसेच सदर नुसार संस्था नोंदणीचे दोन वर्ष पूर्ण झालेली असावी. | आहे | आहे | आहे | आहे |
| 2 | संस्थेची नोंदणी करताना केलेल्या कार्यप्रणालीची छायांकित प्रत व सदर कार्यप्रणाली मध्ये क्रिडा संकुल विषयी कार्य केलेल्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | बयाणा रक्कम | आहे | आहे | आहे | आहे |
| 4 | क्रिडा संकुल चालविणे कामाची शासकीय/निमशासकीय संस्थाचा अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य | नाही | नाही | आहे | नाही |
| 5 | निविदाधारकांनी मागील 1 वर्षाचे संयुक्त ताळेबंद पत्रक सादर करावे. | आहे | आहे | आहे | आहे |
| | | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

वरील 4 निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता मुद्दा क्र. 4 मधील अटीशर्तीनुसार क्रीडा संकुल चालविणे कामाची शासकीय/निमशासकीय असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार चारही निविदा मात्रा होत असल्यामुळे निविदा समितीच्या दि. 29/04/2017 रोजीच्या मंजुरीनुसार सदर निविदाधारकांचे फायनान्शियल बीड उघडले असता निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | चॅम्पियन फाऊंडेशन | केरकर चॅरिटेबल ट्रस्ट | कोकण सेवा संस्था | मानव सेवा प्रतिष्ठान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mira Bhaindar Municipal Corporation invites tender to operate and maintaining sports complex. | 25,26,000/- | 24,99,777/- | 18,18,000/- | 25,11,000/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता चॅम्पियन फाऊंडेशन यांनी सादर केलेली Royalty इतर 3 निविदाधारकांनी सादर केलेल्या Royalty पेक्षा जास्त आहे. तरी जास्त Royalty सादर केलेल्या निविदाधारकांची निविदा स्विकारणेस तसेच सदर Royalty मध्ये प्रति वर्षी 10% वाढ करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

माझे अनुमोदन आहे. मला चर्चा करायची आहे. आपण ज्याला निविदा देतो. त्याच्यामध्ये जे रेट आहेत ते महानगरपालिकेने ठरविलेले रेट असणार की त्याचे असणार.

दिपाली पोवार :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते निविदामध्ये जे रेट टाकले आहेत ते महानगरपालिकेचे आहेत आणि ते त्यांना बंधनकारक आहेत असे निविदेमध्ये नमूद आहे. त्याच्यावर त्याने ती रॉयल्टी सबमीट केली आहे. नंतरच्या वर्षामध्ये 10 टक्के वाढ करुन ते देतील.

हरिश्चंद्र आमगावकर :-

ही जी रॉयल्टी तो देणार तर त्याच्यात तो देखभाल करणार आहे का?

दिपाली पोवार :-

तो सगळ करणार आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

आपल्याला हॅन्डल करुन तो रॉयल्टी जमा करणार दर आपले जे आहेत ते.

दिपाली पोवार :-

मंजुर दर आहेत तेच.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

मर्लिन डिसा :-

आमचे गेल्यावर्षीचे निधीचे जे काम आहे ते प्रभाग समितीच्या कामाचे वर्क ऑर्डर मिळाली नाही. विदाऊट वर्क ऑर्डर कामाचे उद्घाटन होते का?

मा. सभापती :-

खांबित साहेब नाहीत पुढच्या मिटींगला.

प्रकरण क्र. 22 :-

क्रिडा संकुल व्यवस्थापन व संचलनासाठी देणेबाबत मंजूरी.

ठराव क्र. 22 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करणेसाठी दि. 10/07/2017 ते दि. 18/04/2017 रोजी या “महाराष्ट्र सम्राट” तसेच “भायंदर” या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर-निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर फेर-निविदा उघडण्याची अंतिम दि. 18/04/2017 रोजी होती. परंतु सदर फेर-निविदेच्या (Tender ID No. 207436_1) बीड काउंटपेजवरुन दोन निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे सदर फेर-निविदेस दि. 24/04/2017 पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतीमध्ये क्रीडा संकुल व्यवस्थापनाकरीता एकुण

4 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर मुदतवाढीमध्ये बीड काऊंट पेजवरुन चॅम्पियन फाऊंडेशन, केरकर चॅरिटेबल ट्रस्ट, कोकण सेवा संस्था, मानव सेवा प्रतिष्ठान अशा एकुण 4 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांनी निविदेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | चॅम्पियन फाऊंडेशन | केरकर चॅरिटेबल ट्रस्ट | कोकण सेवा संस्था | मानव सेवा प्रतिष्ठान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संस्था नोंदणी अधिनियम 1860, मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम 1950 या पैकी एक नुसार संस्था नोंदणी आवश्यक आहे. तसेच सदर नुसार संस्था नोंदणीचे दोन वर्ष पूर्ण झालेली असावी. | आहे | आहे | आहे | आहे |
| 2 | संस्थेची नोंदणी करताना केलेल्या कार्यप्रणालीची छायांकित प्रत व सदर कार्यप्रणाली मध्ये क्रिडा संकुल विषयी कार्य केलेल्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | आहे | आहे | आहे | आहे |
| 3 | बयाणा रक्कम | आहे | आहे | आहे | आहे |
| 4 | क्रिडा संकुल चालविणे कामाची शासकीय/निमशासकीय संस्थाचा अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य | नाही | नाही | आहे | नाही |
| 5 | निविदाधारकांनी मागील 1 वर्षाचे संयुक्त ताळेबंद पत्रक सादर करावे. | आहे | आहे | आहे | आहे |
| | | पात्र | पात्र | पात्र | पात्र |

वरील 4 निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता मुद्दा क्र. 4 मधील अटीशर्तीनुसार क्रीडा संकुल चालविणे कामाची शासकीय/निमशासकीय असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार चारही निविदा मात्रा होत असल्यामुळे निविदा समितीच्या दि. 29/04/2017 रोजीच्या मंजुरीनुसार सदर निविदाधारकांचे फायनान्शियल बीड उघडले असता निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | चॅम्पियन फाऊंडेशन | केरकर चॅरिटेबल ट्रस्ट | कोकण सेवा संस्था | मानव सेवा प्रतिष्ठान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mira Bhaindar Municipal Corporation invites tender to operate and maintaining sports complex. | 25,26,000/- | 24,99,777/- | 18,18,000/- | 25,11,000/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता चॅम्पियन फाऊंडेशन यांनी सादर केलेली Royalty इतर 3 निविदाधारकांनी सादर केलेल्या Royalty पेक्षा जास्त आहे. तरी जास्त Royalty सादर केलेल्या निविदाधारकांची निविदा स्विकारणेस तसेच सदर Royalty मध्ये प्रति वर्षी 10% वाढ करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर

ठराव सर्वानुमते मंजुर

सही /-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. 23, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपट्टीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करुन 2 वर्ष निगा व देखभाल करणे. (वार्षिक निविदा)

राकेश शहा :-

मिरा भाईंदर शहराला मोठया प्रमाणात सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी किनारपट्टीलगत मोठया प्रमाणात (Mangroves) कांदळवणाची वाढ चांगल्या प्रकारे होते. खा-या पाण्यात सर्वसाधारणपणे भरतीच्या पाण्याच्या पातळीपासुन ते ओहोटीच्या पाण्याच्या पातळीदरम्यान पटटयात ही कांदवळण आढळते. या वनस्पतीची पाने चिवट व हिरवीगार असतात. कांदवळणाची लागवड दलदलयुक्त क्षार जमीन व दुषित पाणी असलेल्या ठिकाणी वाढ चांगली होते.

कांदळवण हे जमिन आणि समुद्र यामधील बफर झोनचे काम करत असुन भरती ओहोटीमुळे होणा-या जमिनीची धुप थांबवते. तसेच कांदळवण हे समुद्रातील विविध जातीचे संरक्षण व संवर्धनाचे काम करते व जागतिक तापमान वाढीमुळे होणा-या नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण करण्याचे काम करते.

कांदवळणाच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनार व त्यावरील प्रदेश यांत एक हिरवी भिंत निर्माण होते त्यामुळे किना-या जवळच्या जमिनीची पाण्यापासनु होणारी धुप थांबते. भुसंरक्षणाच्या दृष्टिने या वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. कांदळवणामुळे (Mangroves) इतर वनस्पती व जीवसृष्टिचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे,खेकडे,झिंगे वैगरे प्राणी येथे अंडी घालतात पिल्ली मोठी झाली कि समुद्राकडे जातात. कांदवळणाची (Mangroves) वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासुन संरक्षण मिळते त्यामुळे ख-या अर्थाने ते तटरक्षकाची भुमिका चोख बजावतात. त्यामुळे जैवविविधते **(Bio- Divercity) मध्ये वाढ होते** एकंदरीत संपुर्ण जीवन साखळी या भागात आकाराला येऊ शकते त्यासाठी खाडीचा भाग कांदळवणाने समृध्द राहणे आवश्यक आहे. तसेच बॅक वॉटर, खाडी या भागात केवळ कांदळवणाच्या अस्तित्वामुळे किती जैवविविधता असु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालचा सुंदरबन प्रदेश आहे.

**सन 2011 मध्ये** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करण्यात आलेली होती त्यानुसार मिरा भाईंदर शहराच्या उत्तर, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पुर्व भागात कांदळवणाच्या एकुण 10 प्रजातीसह **20.7 Km2 क्षेत्र** कांदळवणाचे आढळुन आलेले असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे कांदळवणाची जाती आढळुन आलेल्या आहेत.

| Sr.no | Botanical Name | Common Name |
|---|---|---|
| 1 | Avicennia marina ( Forsk ) Vierh | Tivar |
| 2 | Excoecaria agallocha . | Huri, Geva, Phungi |
| 3 | Rhizophora mucronata Lamk | Kandal |
| 4 | Avicennia officinalis Linn. | Tivar |
| 5 | Ceriops tagal ( per) C. B. Robinson | Kirkiri |
| 6 | Agiceras corniculatum (L.) Blanco | Sugandha |
| 7 | Sonneratia apetala Buch. Ham | Chipi |
| 8 | Bruguieraq cylindrical ( L.) Bl. | Kandal |
| 9 | Lumnitzera racemosa Wild | -- |

पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण कायदा 1986 अन्वये प्रदुषणमुक्त, आरोग्य पुर्ण जीवन जगणे हा प्रत्येक नागरीकाचा हक्क आहे. या गोष्टीसाठी पुरक म्हणुन शासनाने विविध कायदे केले असुन त्या सर्वाचा समावेश करणारा पर्यावरण (संरक्षक) अधिनियम 1986 हा अतिशय महत्त्वपुर्ण असा कायदा आहे.

कांदळवणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/04 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने, दि. 21/10/2005 रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. तसचे कांदळवण संवर्धनाबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारित केले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी दि. 18/04/2017 रोजी E-Tendering On-Line प्रणालीव्दारे N.I.C च्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मुदतीत एकुण 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचे Technical Bid मधील कागदपत्रांची छाननी मा.निविदा समिती समोर केली असता खालील 03 निविदाधारकांचे Fininical Bid उघडण्यास मा निविदा समितीने दि. 11/05/2017 रोजी मान्यता दिलेली आहे.

1) **M/s. Terracon Ecotech Pvt. Ltd.**
2) **M/s. Nisarg Landscape Services**
3) **M/s. Hirawati Enterprises**

त्यानुसार दि. 17/05/2017 रोजी सदर निविदेचे Fininical Bid उघडुन तुलनात्म्क तक्ता/विवरणपत्र सोबत जोडलेले असुन त्याचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव | दर प्रती झाड | एकुण दर |
|---|---|---|---|---|
| 1 | Supply of plants (hights 2 to 2.5 ft) with bamboo stick 3 ft. taller than plant height. Healthy plant. | TERRACON ECOTECH PVT. LTD. | 1) RS. 45/- PER TREE<br>2) RS. 135/- PER TREE | RS. 180 PER TREE |
| 2 | Digging of pit size 1x 1x x 1ft. Removel of debris, | NISARG LANDSCAPE | 1) RS. 198 /- PER TREE | RS.258 PER TREE |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | murum and waste material. Desposal of excavated material away from plantation site. Filling of soil or sediment. Leveling and olantation. Watering and maintenance for two Years (weeding, insecticide, pesticide, fungicide spray fertilizer application etc.) Top dressig with soil and manure, cutting and replaceent of damaged plants etc. | SERVICES | 2) RS. 60 /- PER TREE | |
| | | HIRAWATI ENTERPRISES | 1) RS. 300/- PER TREE | RS. 1799 PER TREE |
| | | | 2) RS. 1499/- PER TREE | |

उपरोक्त □निविदेतील कमी दराचे निविदारधारक **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांना वाटाघाटाकरिता बोलविले असता त्यांनी खलीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर | | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती झाड | एकुण दर | एकुण दर |
| 1 | TERRACON ECOTECH PVT. LTD. | RS. 45/- PER TREE | RS. 180/- | RS. 175/- |
| | | RS. 135/- PER TREE | | |

उपरोक्त नमुदप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांची वाटाघाटीअंती कमी दराची वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि. 24/05/2017 रोजी शिफारस केलेली आहे तथापी मा.आयुक्त□ सो.,यांच्या दालनात मा.आयुक्त सो.,यांच्या समवेत पुन:श्च वाटाघाटी करण्यात आल्या असता **प्रती झाड रु. 3/- □मी □रुन प्रती झाड रु. 172/- याप्रमाणे दर स्वि□ारण्या मा.आयुक्त् सो.,यांनी दि. 25/05/2017 रोजी मान्यता दिलेली आहे.**

**सन 2017-18** या आर्थिक वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी **"□ांदळवण/ तिवरांची लागवड"** लेखाशिर्षा अंतर्गत **रु. 100.00 (रु. ए□ □ोटी मात्र)** ची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदरकामी **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांची वाटाघाटीअंती कमी दराची **वार्षि□ निविदा स्वि□ारण्यास** तसेच **महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे ि□नारपटटीलगत □ांदळवण (Mangroves)** झाडांची **लावगड □रण्यास** व त्याकामी येणा-या **खर्चास मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थि□ व प्रशासि□य मंजुरी देत आहे.**

प्रेमनाथ पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

मर्लिन डिसा :-

कांदळवन जिकडे कापली आहेत तिकडे परत लागवड होणार आहे का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

होणार आहे.

मर्लिन डिसा :-

ज्या ठिकाणी कापून इललिगल बांधकाम झाले असेल त्या ठिकाणी.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

ज्या ठिकाणी स्पेस मिळेल त्या ठिकाणी आपण लावणार.

मर्लिन डिसा :-

स्पेस नाही जिथे मॅंग्रोज कापून बांधकाम केले आहे.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

जागा असेल तर आपण लावणार.

मर्लिन डिसा :-

पण ते इललिगल असेल तर त्याच्यावर अ‍ॅक्शन घेणार नाहीत का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

तिकडे ॲक्शन डिपार्टमेंट घेल.

मर्लिन डिसा :-

ते कांदळवन कापून इललिगली एन्क्रोच केले आहे.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

एन्क्रोचचा विषय वेगळा आहे. दलदलीच्या ठिकाणी आपण लावणार.

मर्लिन डिसा :-

कांदळवनची जी एरिया आहे.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्याठिकाणी.

मर्लिन डिसा :-

हे एक्सप्लेनेशन बरोबर नाही.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

लगेचच्या लगेच काय बांधकाम तोडणार का विषय वेगळा आहे.

मर्लिन डिसा :-

विषय वेगळा नाही. तिकडे पुन्हा लावायला लागेल ना.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे तिकडे लावणार.

वर्षा भानुशाली :-

मा. सभापती साहेब फेरिवाल्यांचा विषय तसाच राहतो.

शर्मिला बगाजी :-

पानपट्टे साहेब हे कांदळवन सागरी किनाऱ्याजवळ तुम्ही एरिया ठरवला आहे का की तिकडे लागवड करणार आहेत.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, मुर्धा, उत्तन, डोंगरी ज्या ठिकाणी खार लॅन्ड आहे त्याठिकाणी लावणार आहोत.

शर्मिला बगाजी :-

उत्तनमध्ये खार लॅन्डच आहे. उत्तनचा किनारा आपल्या शहरात मोठा आहे. पण तिथे लागवड करण्यासाठी स्पेस राहिली आहे का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

त्या ठिकाणी स्पेस उपलब्ध असेल. शासनाचे आदेश आहेत.

शर्मिला बगाजी :-

शासनाचे आदेश आम्ही समजू शकतो. जिथे नाल्यामध्ये जो उत्तनमध्ये एकच नाला आहे आणि मॅंग्रोज वाढलेले आहेत. तिथे परत अजून लागवड करणार.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

तिथे लावणार नाही. आपण कांदळवनसाठी रिपीटीशन केले आहे. 5-6 दिवसांमध्ये परवानगी मिळेल. आपली प्रोसीजर चालू आहे. जागा उपलब्ध आहे. किनारपट्टीची जागा आहे. खारोली एरिया आहे. त्याठिकाणी लावणार आहेत. हायकोर्टाचे डायरेक्शन आहेत. इकोझोन मेन्टेन करण्यासाठी लावतो.

मर्लिन डिसा :-

भाईंदर स्ट, भाईंदर वेस्ट, रा, मुर्धा, मोर्वा, मिरारोड तिकडे पण आहे ना. मग तिथे लावणार नाही का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

तिकडे पण आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो साहेब तुम्ही ही लागवड करता पण जिथे आहे ते तोडता त्याच्यावर काय कारवा करता. मिरा भाईंदरमध्ये किती ठिकाणी लागवड होती ती तोडून भरणी केली. त्याच्यावर पालिका दुर्लक्ष करते आणि इकडे तुम्ही सांगता लागवड करायची आहे. त्याची तुमच्याकडे नोंद असताना तुम्ही कारवा करत नाही.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

त्याचे डिपार्टमेंट वेगळे आहे ते कारवा करते ना.

हरिश्चंद्र आमगावकर :-

इकडे लागवड करायला सांगता तिकडे तोडतात त्याच्यावर काय कारवा□ केली ते सांगा.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

त्याच्यावर वेळोवेळी कारवा□ होते.

मर्लिन डिसा :-

काही नाही होत तुम्ही आम्हाला सांगा. किती कारवा□ झाली आणि कुठे झाली.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

त्याच्या वेगळ्या ॲथोरिटीने पोलीस स्टेशन आणि तहसीलमार्फत कारवा□ होते.

मर्लिन डिसा :-

कुठे केली आहे ते आम्हाला सांगा.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

आतापर्यंत कुठे कुठे कारवा□ केली ते माहिती घेऊन सांगतो.

हरिश्चंद्र आमगावकर :-

इंद्रलोकच्या किनारपट्टीला पूर्ण भरणी केली आहे.

शरद पाटील :-

मला ह्या विषयावर बोलायचे आहे. तिथे शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. माझ्या माहितीनुसार महानगरपालिकेनी भरणी केली आहे आणि त्याच्या केसेस शेतकऱ्यांवर लागतात. ह्याची जबाबदारी कोणाची आहे. महानगरपालिकेनी कचऱ्याची भरणी केली आहे. 200 रुपये गाडी घेऊन शेतकऱ्यांना भरणी करायला लावली.

मर्लिन डिसा :-

200 रु. नाही एका गाडीचे 2500 रुपये घेतात.

शरद पाटील :-

नाही त्यावेळेस शिवमुर्ती ना□क साहेब होते. मी सुध्दा जमीनदार आहे. मला सुध्दा नोटीस आली होती. शिवमुर्ती ना□क साहेबांनी बोललो होतो. तहसीलदार आणि इन्सपेक्टरना सांगितले ते महानगरपालिकेने दिले आणि त्याच्यावर कचरा टाकलेला आहे. पण आता परत परत नोटिस येतात त्याची जबाबदारी कोणाची?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

आपण कचरा टाकला नाही.

शरद पाटील :-

ती भरणी कसली आहे. आम्ही तर बोलणार आहोत तुम्ही खोदून बघा त्याच्यात कचऱ्याची भरणी आहे.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

आमच्याकडे रेकॉर्ड असेल ना आम्ही तुम्हाला प्रोटेक्ट करु. कचरा टाकला असेल तर आम्ही तुम्हाला नक्कीच सहकार्य करु.

(सभागृहात गोंधळ)

हरिश्चंद्र आमगावकर :-

साहेब हे हायकोर्टाचे आदेश आहेत पण ज्या ठिकाणी तोडले तिकडे सर्व्हे केला का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

त्याच्यावर कारवा□ करण्याचे डिपार्टमेंट वेगळे आहे.

मर्लिन डिसा :-

तुम्ही लागवड करायला परवानगी मागता. किती एरियाला करणार ते सांगा. किती एरियामध्ये करणार त्याचा सर्व्हे केला नाही. कुठे कुठे करायचे ते सांगा.

प्रेमनाथ पाटील :-

मँग्रोजचे बीज बघितले का?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

मी बघितले नाही.

प्रेमनाथ पाटील :-

पानपट्टे साहेब ऐका आम्ही पण शेतकरी आहोत. समुद्र किनारी जी मँग्रोज होती त्याची फळ पडायची. तेव्हा भरतीने ती फळ शेतामध्ये यायची आणि ती फळ उगवायची. त्याच्यामुळे भात शेती कमी झाली आणि मँग्रोजची शेती जास्त झाली.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

मुर्ध्याला 13788 चौ. मी. लावणार, उत्तन डोंगरी खार लॅन्डला 92488 चौ.मी. लावणार, मिरारोडला 21537 चौ.मी. लावणार आणि काजूपाडा 28723 चौ.मी. असे टोटल 127290 चौ.मी. लावणार आहोत.

मर्लिन डिसा :-

मिरारोडला कुठे?

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

सृष्टीकडे.

प्रेमनाथ पाटील :-

इरकर साहेब काजूपाड्याला कुठे लावणार.

इरकर :-

साहेब सर्व्हे केला आहे.

प्रेमनाथ पाटील :-

मँग्रोजने पूर्ण भरलेले आहे.

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

साहेब जागा असेल तर लावणार.

प्रेमनाथ पाटील :-

हिरवा पट्टा पूर्ण मँग्रोजने भरलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-

गूगल मॅपने फोटो काढलेले आहेत. ज्या ज्या ठिकाणी नाहीत तिकडे लावणार आहोत. किनारपट्टी सा�डला सगळीकडे लावणार आहोत.

मर्लिन डिसा :-

जाफरी खाडीला कसे करणार तुम्ही बोटमध्ये उतरुन का?

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 23 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपट्टीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लागवड करुन 2 वर्ष निगा व देखभाल करणे. (वार्षिक निविदा)

ठराव क्र. 23 :-

मिरा भाईंदर शहराला मोठया प्रमाणात सागरी किनारा लाभलेला आहे. सागरी किनारपटटीलगत मोठया प्रमाणात (Mangroves) कांदळवणाची वाढ चांगल्या प्रकारे होते. खा-या पाण्यात सर्वसाधारणपणे भरतीच्या पाण्याच्या पातळीपासुन ते ओहीटीच्या पाण्याच्या पातळीदरम्यान पटटयात ही कांदवळण आढळते. या वनस्पतीची पाने चिवट व हिरवीगार असतात. कांदवळणाची लागवड दलदलयुक्त क्षार जमीन व दुषित पाणी असलेल्या ठिकाणी वाढ चांगली होते.

कांदळवण हे जमिन आणि समुद्र यामधील बफर झोनचे काम करत असुन भरती ओहोटीमुळे होणा-या जमिनीची धुप थांबवते. तसेच कांदळवण हे समुद्रातील विविध जातीचे संरक्षण व संवर्धनाचे काम करते व जागतिक तापमान वाढीमुळे होणा-या नैसर्गिक आपत्तीपासुन संरक्षण करण्याचे काम करते.

कांदवळणाच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनार व त्यावरील प्रदेश यांत एक हिरवी भिंत निर्माण होते त्यामुळे किना-या जवळच्या जमिनीची पाण्यापासनु होणारी धुप थांबते. भुसंरक्षणाच्या दृष्टिने या वनस्पती अतिशय महत्वाच्या आहेत. कांदळवणामुळे (Mangroves) इतर वनस्पती व जीवसृष्टिचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे,खेकडे,झिंगे वैगरे प्राणी येथे अंडी घालतात पिल्ली मोठी झाली कि समुद्राकडे जातात. कांदवळणाची (Mangroves) वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासुन संरक्षण मिळते त्यामुळे ख-या अर्थाने ते तटरक्षकाची भुमिका चोख बजावतात. त्यामुळे जैवविविधते **(Bio- Divercity) मध्ये वाढ होते** एकंदरीत संपुर्ण जीवन साखळी या भागात आकाराला येऊ शकते त्यासाठी खाडीचा भाग कांदळवणाने समृध्द राहणे आवश्यक आहे. तसेच बॅक वॉटर, खाडी या भागात केवळ कांदळवणाच्या अस्तित्वामुळे किती जैवविविधता असु शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे पश्चिम बंगालचा सुंदरबन प्रदेश आहे.

**सन 2011 मध्ये** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षगणना करण्यात आलेली होती त्यानुसार मिरा भाईंदर शहराच्या उत्तर, दक्षिण-पश्चिम आणि उत्तर-पुर्व भागात कांदळवणाच्या एकुण 10 प्रजातीसह **20.7 Km2 क्षेत्र** कांदळवणाचे आढळुन आलेले असुन सदर ठिकाणी खालीलप्रमाणे कांदळवणाची जाती आढळुन आलेल्या आहेत.

| Sr.no | Botanical Name | Common Name |
|---|---|---|
| 1 | Avicennia marina ( Forsk ) Vierh | Tivar |
| 2 | Excoecaria agallocha . | Huri, Geva, Phungi |
| 3 | Rhizophora mucronata Lamk | Kandal |
| 4 | Avicennia officinalis Linn. | Tivar |
| 5 | Ceriops tagal ( per) C. B. Robinson | Kirkiri |
| 6 | Agiceras corniculatum (L.) Blanco | Sugandha |
| 7 | Sonneratia apetala Buch. Ham | Chipi |
| 8 | Bruguieraq cylindrical ( L.) Bl. | Kandal |
| 9 | Lumnitzera racemosa Wild | -- |

पर्यावरण संरक्षण व प्रदुषण नियंत्रण कायदा 1986 अन्वये प्रदुषणमुक्त, आरोग्य पुर्ण जीवन जगणे हा प्रत्येक नागरीकाचा हक्क आहे. या गोष्टीसाठी पुरक म्हणुन शासनाने विविध कायदे केले असुन त्या सर्वाचा समावेश करणारा पर्यावरण (संरक्षक) अधिनियम 1986 हा अतिशय महत्त्वपुर्ण असा कायदा आहे.

कांदळवणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/04 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी आदेश पारित केले आहेत. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने, दि. 21/10/2005 रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे. तसचे कांदळवण संवर्धनाबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी आदेश पारित केले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी दि. 18/04/2017 रोजी E-Tendering On-Line प्रणालीव्दारे N.I.C च्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मुदतीत एकुण 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचे Technical Bid मधील कागदपत्रांची छाननी मा.निविदा समिती समोर केली असता खालील 03 निविदाधारकांचे Fininical Bid उघडण्यास मा निविदा समितीने दि. 11/05/2017 रोजी मान्यता दिलेली आहे.

1) **M/s. Terracon Ecotech Pvt. Ltd.**
2) **M/s. Nisarg Landscape Services**
3) **M/s. Hirawati Enterprises**

त्यानुसार दि. 17/05/2017 रोजी सदर निविदेचे Fininical Bid उघडुन तुलनात्मक तक्ता/विवरणपत्र सोबत जोडलेले असुन त्याचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | ठेकेदाराचे नाव | दर प्रती झाड | एकुण दर |
|---|---|---|---|---|
| 1 | Supply of plants (hights 2 to 2.5 ft) with bamboo stick 3 ft. taller than plant height. Healthy plant. | TERRACON ECOTECH PVT. LTD. | 3) RS. 45/- PER TREE<br>4) RS. 135/- PER TREE | RS. 180 PER TREE |
| 2 | Digging of pit size 1x 1x x 1ft. Removel of debris, murum and waste material. Desposal of excavated material away from plantation site. Filling of soil or sediment. Leveling and olantation. Watering and maintenance for two Years (weeding, insecticide, pesticide, fungicide spray fertilizer application etc.) Top dressig with soil and manure, cutting and replaceent of damaged plants etc. | NISARG LANDSCAPE SERVICES | 3) RS. 198 /- PER TREE<br>4) RS. 60 /- PER TREE | RS.258 PER TREE |
| | | HIRAWATI ENTERPRISES | 3) RS. 300/- PER TREE<br>4) RS. 1499/- PER TREE | RS. 1799 PER TREE |

उपरोक्त निविदेतील कमी दराचे निविदारधारक **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांना वाटाघाटाकरिता बोलविले असता त्यांनी खलीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र | ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर | | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती झाड | एकुण दर | एकुण दर |
| 1 | TERRACON ECOTECH PVT. LTD. | RS. 45/- PER TREE<br>RS. 135/- PER TREE | RS. 180/- | RS. 175/- |

उपरोक्त नमुदप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांची वाटाघाटीअंती कमी दराची वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि. 24/05/2017 रोजी शिफारस केलेली आहे तथापी मा.आयुक्त सो.,यांच्या दालनात मा.आयुक्त सो.,यांच्या समवेत पुन:श्च वाटाघाटी करण्यात आल्या असता **प्रती झाड रु. 3/- कमी करुन प्रती झाड रु. 172/- याप्रमाणे दर स्विकारण्या मा.आयुक्त् सो.,यांनी दि. 25/05/2017 रोजी मान्यता दिलेली आहे.**

**सन 2017-18** या आर्थिक वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves) झाडांची लावगड करूण 2 वर्षे निगा व देखभाल करणेकामी **"कांदळवण/ तिवरांची लागवड"** लेखाशिर्षा अंतर्गत **रु. 100.00 (रु. एक कोटी मात्र)** ची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदरकामी **M/s .Terracon Ecotech Pvt. Ltd.** यांची वाटाघाटीअंती कमी दराची **वार्षिक निविदा स्विकारण्यास** तसेच **महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे किनारपटटीलगत कांदळवण (Mangroves)** झाडांची **लावगड करण्यास** व त्याकामी येणा-या **खर्चास मा. स्थायी समिती सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.**

सुचक :- श्री. राकेश शाह           अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सही /-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. 24, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण करुन 2 वर्ष निगा व देखभाल करणे. (वार्षिक निविदा)

राकेश शहा :-

सन 2017 ते 2019 या वर्षामध्ये दरवर्षी जुन जुलै महिन्यात एकंदर 3 वर्षाच्या कालावधीमध्ये 50 कोटी वृक्षलागवडीच्या कार्यक्रमाचा वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अमलबजावणी करणेसाठी **शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र.सावधि- 2016/ प्र.क्र.80/फ-11मंत्रालय मुंबई यांचे दि.10/10/2016 रोजीचे पत्र व अ.शा,पत्र क्र.सावधि-2016/ प्र.क्र.80/फ-11 सचिव (वने) महसुल व वन विभाग, मंत्रालय मुबई** यांचे दि.23/11/2016 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तसेच शासनाकडून वृक्षारोपन करणे कामाच्या बाबतीत वारंवार पाठपुरावा होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रामभाऊ म्हाळगी प्रबोधीनी व केशवसृष्टी यांनी 3000 रोपे लागवडीबाबत मागणी केलेली असुन सदर ठिकाणी 3000 रोपांची लागवड महापालिकामार्फत लागवड करुन दयावी तसेच शाळा, कॉलेज, सामाजिक संस्था इत्यादी ठिकाणी आवश्यकतेनुसार लागवड करावी, खाजगी सोसायटया यांना मोफत रोपे वृक्षारोपण करीता उपलब्ध करुन दयावी.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सन 2017 (जुन-जुलै) मध्ये जास्तीत जास्त वृक्षारोपण करणेकरिता विविध ठिकाणी वृक्षारोपण करुन 2 वर्ष निगा व देखभाल करणेकामी दि. 31/03/2017 रोजी E-Tendring On-Line प्रणालीव्दारे N.I.C च्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मुदतीत एकुण 05 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाधारकांचे Technical Bid तपासणी करीता दि. 02/05/2017 रोजी निविदा समिती समोर सादर केले असता 02 निविदाधारक पात्र होत असल्याने मा.निविदा समितीने फेर निविदा मागविण्यास शिफारस केली व त्यास मा.आयुक्त सो.,यांनी दि. 05/05/2017 रोजी मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार दि. 06/5/2017 रोजी E-Tendering On-Line प्रणालीव्दारे N.I.C च्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानुसार मुदतीत एकुण 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांचे Technical Bid मधील कागदपत्रांची छाननी मा.निविदा समिती

समोर केली असता खालील 03 निविदाधारकांचे Fininical Bid उघडण्यास मा निविदा समितीने दि. 22/05/2017 रोजी शिफारस केली आहे.

1) **M/s. Aniket Agro Services**
2) **M/s. Nisarga Landscape Services**
3) **M/s. Sairaj Green**

त्यानुसार दि. 22/05/2017 रोजी सदर निविदेचे Fininical Bid उघडुन तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr No | Discripation | Tree Verities | Aniket Agro Services | Nisarga Landscape Services | Sairaj Green |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Digging of pit size 0.75 m. x 0.75 m. x 0.75 m. Removal of debris, murum and waste material. Disposal of excavated material away from plantation site. Filling of good garden soil and manure. Leveling and plantation. Polybag Size 18 inch, Plant height 8 to 10 ft. Trunk Size 20 cm, Canopy Branch 1 meter length Age 1.5 to 2 years Staking with bamboo stick 1 ft. taller than plant height. Watering and maintenance for Two Years (weeding, insecticide, pesticide, fungicide spray, fertilizer application etc.) Top dressing with soil and manure, cutting and replacement of damaged plants etc. | **a)** Forst Plant Peltororum, Ashok Gulmohar, Lagistromia, rosia, Alstonia, Kadamb, Tabebuia Spathodia Neem,, Badam, Barringtonia, Karanj, Bakul and other various Forest Plant. | रू. 3250 /- प्रती झाड | रू.३१००/- प्रती झाड | रू. 3300/- प्रती झाड |
| | | b) Wad, pimpal, umbar | रू. 3400/- प्रती झाड | रू. **3300/-** प्रती झाड | रू.3500/- प्रती झाड |
| | | c) Samudrafal | रू. 4000/- प्रती झाड | रू. **3500/-** प्रती झाड | रू.3600/- प्रती झाड |
| | | d) Coconut | रू. 3000/- प्रती झाड | रू. **2800/-** प्रती झाड | रू. 2900/- प्रती झाड |
| | | e) Bottal palm, fox teil palm | रू. **2900/-** प्रती झाड | रू. 3000/- प्रती झाड | रू. 3050/- प्रती झाड |
| 2 | Digging of pit size 0.75 m. x 0.75 m. x 0.75 m. Removal of debris, murum and waste material. Disposal of excavated material away from plantation site. Filling of good garden soil and manure. Leveling and plantation. Polybag Size 16 inch, Plant height 7 to 8 ft. Trunk Size 20 cm, Canopy Branch 1 meter length, Age 1.5 to 2 years. Staking with bamboo stick 1 ft. taller than plant height. Watering and maintenance for Two Years (weeding, insecticide, pesticide, fungicide spray, fertilizer application etc.) Top dressing with soil and manure, cutting and replacement of damaged plants etc. | kadipatta, citrus, chiku ,chich, charoli, bhokhar, ambadi, kavat, bel, khair, ritha, bibba, khitavi, shevga, sagargota, shiikekai, guj, bhehada, hirda, suru, tuti (malberi), karanj, ashok, badam, karvand, bahava, taman, kanchan, sitha ashok, surangi, sonchafa, parijat, botalbarsh, bakul, gulmohar, pagara, sitafal, peru, jambhul, fanus, etc. | रू. 3000/- प्रती झाड | रू. **2800/-** प्रती झाड | रू.2900/- प्रती झाड |
| 3 | Supply of Forst trees polybag size 13 x 13 inches Hight of plants 6 - 8 feet Age - 1.5 to 2 year. | putanjia,jacaranda, bakul, kecia, neem, gulmohar etc. | रू. **2400/-** प्रती झाड | रू. 2500/- प्रती झाड | रू.2600/- प्रती झाड |
| 4 | Supply of Forst trees polybag size 16 x 16 inches Hight of plants 8 - 10 feet Age - 1.5 to 2 year. | ( peltophorum, bakul kesiya, neem, tabobia etc. | रू. 2800/- प्रती झाड | रू. 2700/- प्रती झाड | रू.**2600/-** प्रती झाड |
| 5 | Supply of Wad, pimpal, umbar polybag size 13 x 13 inches Hight of plants 5 - 7 feet Age - 1 to 1.5 year. | Wad, pimpal, umbar | रू. 2950/- प्रती झाड | रू.**2800/-** प्रती झाड | रू.2900/- प्रती झाड |

उपरोक्त□नमुदप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून 2 वर्ष निगा व देखभाल करणेकामाच्या वार्षिक निविदेतील 1) मे. अनिकेत ॲग्रो सर्व्हिसेस 2) मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस 3) मे.सा□राज ग्रीन यांची वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर कमी करून वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि.24/05/2017 रोजी शिफारस केलेली असुन सदर दराबाबत मा. आयुक्त सो.,यांनी दि.26/05/2017 रोजी पुन:श्च वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे.

| Sr No | Discripation | Tree Verities | मा.निविदा समितीने वाटाघाटीनंतर □मी □लेले दर | मा.आयुक्त् सो.,यांनी वाटाघाटीनंतर □मी □लेले दर |
|---|---|---|---|---|
